# कार्यावली

## सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवन येथे सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली

**एक** : अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**पाच** : सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्प सादर करणे.

**सहा** : सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**सात** : सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

**आठ** : सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**नऊ** : सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**दहा** : सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ च्या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे.

**अकरा** : सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ च्या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

**बारा** : शासकीय विधेयके.

**तेरा** : शोक प्रस्ताव.

**चौदा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

एचबी २७८९–१

**पंधरा : अशासकीय विधेयके :–**

**विचारार्थ—**

**(१)** सन २०१९ चे वि.स.वि. क्रमांक ५० - भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ - **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २०१९ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

**सोळा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :—**

**श्री. मोहन मते, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २, ७ व ८**

(२) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्राना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७) "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अल्प प्रमाण लक्षात घेता, हे प्रमाण अधिकरित्या वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पद्धतीने योग्य प्रकारे पूर्व तयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३ व ६**

(३) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा-

अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधाप्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने राजस्थान राज्याप्रमाणेच राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११, १२, १३ व १४**

(११) "खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२) "राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदुषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जल प्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३) "राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना पुरेशा निधी अभावी प्रयोगशाळा ग्रंथालये आणि इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व शाळांची चालू शैक्षणिक वर्षात तपासणी करून दोषी आढळणाऱ्या शाळा शासनाने ताब्यात घेऊन स्वतः चालवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते अवजारे कीटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता शेतकऱ्यांना कीटकनाशके व रासायनिक खते वाजवी दरात मिळण्यासाठी कराची रक्कम (वस्तू व सेवा कर) कमी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८ व १९**

(१६) "ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारेपाणी शेत जमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंबलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती जास्त असल्यामुळे ही महागडी औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य रुग्णांना परवडणारे नसल्यामुळे अशा आवश्यक असलेल्या औषधाअभावी अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागत असणे, यासाठी राज्यात जेनेरिक औषधाना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता तसेच या जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधाप्रमाणेच येत असून या औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने जेनेरिक औषधांची दुकाने संपूर्ण राज्यात सुरू करून ती सर्वसामान्य रुग्णांना स्वस्त दारात उपलब्ध करून देव्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९) “मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे मुंबईतील इमारतीच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती वेळीच न झाल्याने ऐन पावसाळ्यात त्या इमारतीतील रहिवाशांत पसरणारे भीतीचे व असुरक्षिततेची तीव्र भावना, तसेच काही भागात इमारती कोसळून जीवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रकार, त्यामुळे निर्माण झालेली चिंतेची, असुरक्षिततेची स्थिती दूर करण्यासाठी शासनाने त्वरीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २०, २४ व २६**

(२०) “राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२४) “महाराष्ट्र राज्यातील वाढती लोकसंख्या व अन्नधान्याचे होणारे उत्पादन यामधील तफावत, मागील काही वर्षात शेती मालाच्या उत्पादनात होणारी घट, त्यामुळे किरकोळ बाजारात अन्नधान्याची भाव वाढ, उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना लागवडी खर्चाच्या तुलनेत न मिळणारा हमी दर, त्यामुळे राज्याच्या गरजे पेक्षा कमी होत असलेले अन्नधान्याचे उत्पादन नियोजितपणे वाढविण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२६) “राज्यातील प्रमुख शहरातून मोठ्या प्रमाणात वाढत असलेली अनधिकृत बांधकामे, त्याला आळा घालण्यासाठी स्थानिक संस्थांचे तसेच शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती व समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २१, २३ व २५**

(२१) “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे

कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद असल्यामुळे व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५) "राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८, ३० व ३१**

(२८) "दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०) "राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या

जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१) "राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. मोहनराव हंबर्डे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३२, ३३, ३४ व ३६**

(३२) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३) "राष्ट्रीयस्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४) "राज्यातील नागरिकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत असून राज्य शासनाच्या नियमानुसार ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सोयी सुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयीसुविधा ६० वर्षेवरील ज्येष्ठ नागरिकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही जेष्ठ नागरिकांची वर्यामर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३६) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारा अभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. हिरामण खोसकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३९ व ४१**

(३९) "राज्यातील विशेषतः मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरुस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४१) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ४३**

(४३) "कोकणातील आंबा, काजू, फणस, जांभूळ, करवंद, कोकम, आवळा, चिंच, नारळ, बोर आदी फळांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन हाऊनही एकूण उत्पादनापैकी केवळ दीड टक्का फळांवर प्रक्रिया होते. कोकणात दिवसागणिक नाशवंत असल्यामुळे उर्वरित उत्पादन वाया जाते. वाढणारे बेरोजगारीचे प्रमाण, केवळ निसर्गावर अवलंबून भातपीक घेऊन कुटुंबाची गुजराण करणारा शेतकरी आणि छोटे छोटे उद्योग व्यवसाय करण्यास उत्सुक असणारे महिला बचतगट यांना उत्पन्नाचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, यासाठी फळप्रक्रिया उद्योगांचा टक्का वाढण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. कुणाल पाटील वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४५ व ४६**

(४५) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४६) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रानां रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे,

राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकिय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५३, ५५, ५६ व ५७**

(५३) "मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राह्य धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे. सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यकती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५५) "मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही, केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरिता, आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता, 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५६) "महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५७) "राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती सुलभा खोडके वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५८ व ५९**

(५८) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगाराची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना

नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५९) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्यादृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. भिमराव तापकीर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६२ व ६४**

(६२) "राज्यामध्ये कोट्यवधी रुपयांची तरतूद करून ग्रामीण भागामध्ये मंजूर केलेल्या अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना वर्षानुवर्षे संथ गतीने सुरू असणे, पुणे जिल्ह्यातील तालुका हवेली अंतर्गत किल्ले सिंहगड सह खडकवासला मतदारसंघातील सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० मधील मंजूर पाणी योजना मंजूर असतांना अद्यापही त्या सुरू झाल्या नसल्याने योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि योजनांना गती देण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६४) "पुणे शहराचे झपाट्याने वाढत असलेले नागरीकरणामुळे यामध्ये सिंहगड रोड, कात्रज चौक, बालाजी नगर, नवले पूल, वारजे चौक भागातील वाढत्या नागरीकरणाबरोबर वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ लक्षात घेता या भागातील अरुंद रस्ते, आवश्यक उपाययोजनांची कमतरता यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी या भागातील वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी आवश्यक ठोस प्रभावी उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राणाजगजीतसिंह पाटील वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ६५**

(६५) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा

काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती मंदा म्हात्रे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६८, ६९, ७०, ७१ व ७२**

(६८) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६९) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रानां रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकिय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७०) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासनीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७१) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७२) “राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. लक्ष्मण जगताप वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७९, ८०, ८१ व ८२**

(७९) “राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८०) “राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारा घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८१) “देशाला स्वांतत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(८२) “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना

आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८४, ८५, ९६ व ९७**

(८४) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८५) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९६) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९७) "राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ९०**

(९०) "राज्यात अनेक कुटुंबांचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्यरेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,०००/- वार्षिक उत्पन्न दारिद्र्य रेषेची मर्यादा १० वर्षांपूर्वी ठरवलेली असणे, तसेच शासनाने नेहरू रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्य रेषेची मर्यादा रुपये २५,०००/- ठरवलेली असणे, यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, कलर टी. व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल केल्या असणे, दारिद्र्यरेषेसाठी असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने

६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असल्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची मर्यादा रुपये १५,०००/- वरून रुपये ५०,०००/- करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ९८, ९९, १००, १०१ व १०२**

(९८) "राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली समस्या, घनकचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करता येत नसल्यामुळे दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, याकरिता या घनकचऱ्यामधून निर्माण होणाऱ्या मिथेन गॅसपासून वीज निर्मिती करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९९) "अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला "संत गजानन महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला" असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापीठाचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१००) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासनीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०१) "राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरू करणे, सदरची उपचार केंद्रे सुरू झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे,

राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०२) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सूचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०३, १०४ व १०५**

(१०३) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०४) "देशाला स्वांतत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०५) "महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०६, १०७ व १०९**

(१०६) "दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज

निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०७) "राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०९) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११०, १११, ११२, ११३ व ११४**

(११०) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१११) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११२) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरिता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११३) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११४) "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयांचे झालेले अवमूल्य यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्ररेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११५, ११६, ११७, ११८ व ११९**

(११५) "तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११६) “राज्यातील दारिद्र्यरेषेखालील व वयाची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्ध शेतकऱ्यांना तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कष्टकरी मजुरांना दरमहा ५०० ते १५०० रुपये निवृत्तिवेतन शासनाकडून देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११७) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११८) “राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(११९) “राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**ॲड. राहुल ढिकले, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १२२, २३५ व २३६**

(१२२) “राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी मोठ्या नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील महानगरपालिका क्षेत्रात विशेषतः नाशिक जिल्ह्यातील गोदावरी, दारणा, वाल नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून नागरिकांच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२३५) "राज्यात महिला, तरुण व अल्पवयीन मुली व लहान मुले व मुली यांच्यावर होणाऱ्या अत्याचारामध्ये प्रचंड वाढ होणे व त्यांचे होणारे मृत्यु विचारात घेता अत्याचारित महिला, मुली व लहान मुलांच्या अत्याचाराबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र जलदगती न्यायालये तातडीने स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३६) "राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यामध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यामध्ये प्राधान्य देण्यात यावे,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १२३, १२४, १२५ व १२६**

(१२३) "राज्यातील उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश, राज्यातील बेरोजगार तसेच खाजगी अस्थापनेवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२४) "राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२५) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२६) "राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संग्राम थोपटे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १२७, १२८, १२९, १३० व १३१**

(१२७) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२८) "पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्ह्यातील जनतेच्या सोयीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२९) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३०) "राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या

क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३१) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रानां रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अमिन पटेल वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १३२, १३३, १३४ व १३६**

(१३२) "राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदाना अभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३३) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३४) "राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत असून राज्यशासनाच्या नियमानुसार ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयीसुविधा ६० वर्षेवरील ज्येष्ठ नागरिकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही ज्येष्ठ नागरिकांची वर्यामर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३६) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. अमित झनक वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १३८, १४० व १४१**

(१३८) “केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१४०) “राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरुस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुती करणासाठी निधी उपलब्ध करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१४१) “राज्यातील सर्व महामार्गावर रहदारी ही मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्याचे योग्य नियोजन न होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघांताचे वाढते प्रमाण, त्यात होत आलेली मनुष्यहानी व वित्तहानी बघता यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. सुरेश वरपुडकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १४२, १४४, १४५ व १४६**

(१४२) “राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१४४) “राज्यातील विशेषतः मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरुस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या

अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४५) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४६) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकीरीचे होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे हितासाठी धोरण ठरवून जनजागृती व वृद्धांसाठी हेल्पलाईन व वेबसाईट सुलभ करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. भारती लव्हेकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १४७, १४९ व १५०**

(१४७) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसळयात इमारती कोसळून जिवित व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पहाणी न करणे, तसेच इमारतींच्या पुर्नरचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात योग्य ती अंमलबजावणी करुन त्यावर परिणामकारक उपायोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४९) "राज्याच्या ग्रामीण भागामध्ये आदिवासी महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार, तसेच सामाजिक दृष्टया वंचित घटकांना संरक्षण मिळावे तसेच निष्पाप मुलींचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५०) "राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देवून सुरू करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होवू शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना

(शा.म.मु.) एचबी २७८९–४ (१२००–२-२०२०)

अनुदानतत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विकास ठाकरे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १५४ व १५५**

(१५४) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५५) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्यादृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. किसन कथोरे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १५७ व १५८**

(१५७) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनाचे काम अदयापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनाचे रखडलेले काम तत्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५८) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रानां रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दिपक चव्हाण वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६१, १६२, १६३ व १६४**

(१६१) "राज्यात उद्योग जगतात मोठ्याप्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६२) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६३) "महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक' असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६४) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६८, १६९ व १७०**

(१६८) "लोकसभा, विधानसभा तसेच लोकप्रतिनिधीच्या निवडीसाठीच्या विविध निवडणुकींमध्ये मतदाराने अत्यल्प प्रमाण लक्षात घेता व त्यामुळे लोकशाही मुल्यांचा होणारा ऱ्हास लक्षात घेता मतदान अनिवार्य करण्याकरिता कडक कायदा करावा यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६९) “देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांना तसेच उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृद्धीचा प्रकाश निर्माण करत सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालणारे, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न या सर्वोच्च उपाधीने सन्मानीत करावे यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१७०) “राज्यात मध्यम, लघु व सुक्ष्म उद्योगांना चालना मिळावी व त्या माध्यमातुन स्थानिक उद्योजकांना उद्यमशील करण्याच्या दृष्टीने तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने राज्यात ५० एमएसएमई पार्क उभारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. फारूक शाह वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १७१, १७२, १७४ व १७५**

(१७१) “राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१७२) “राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत असून राज्यशासनाच्या नियमानुसार ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयीसुविधा ६० वर्षेवरील ज्येष्ठ नागरीकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१७४) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१७५) “राष्ट्रीयस्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. हितेंद्र ठाकूर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १८०, १८१ व १८२**

(१८०) “ठाणे, पालघर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवर अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धुपप्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा वादळी वाऱ्यामुळे फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तिव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१८१) “राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भुंकप वगैरे नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी व बाधित नागरिकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१८२) “राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. महेंद्र दळवी वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १८६, १८७, १८८ व १८९**

(१८६) “राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम

तात्काळ पूर्ण करण्यासाठी क्रम राबविण्यात यावा, कालबद्ध धडक कार्य, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८७) "तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकिय इमारतीत असावीत, जेणे करून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८८) "राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावातून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी दिरंगाई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्या अभावी होणारे हाल विचारात घेता कायम स्वरुपी पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने ठोस कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८९) "राज्यातील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडचणी येत असणे, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी शासनाने रु. १५,००० ही उत्पन्न मर्यादा ठरवलेली असणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयांचे झालेले अवमुल्यन, यामुळे किमान रुपये ५०,००० उत्पन्न मर्यादा करण्याची गरज निर्माण झालेली असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी उत्पन्न मर्यादेबाबतचा निकष सुधारित करण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. नितीन पवार वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १९१, १९२, १९३ व १९४**

(१९१) "राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९२) "तालुक्यातील सर्व शासकिय कार्यालये एकाच प्रशासकिय इमारतीत असावीत, जेणे करून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९३) "राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावातून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी दिरंगाई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्या अभावी होणारे हाल विचारात घेता कायम स्वरुपी पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने ठोस कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९४) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब, यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. मिहीर कोटेचा वि.स.स. यांचा ठराव क्रमांक २०५**

(२०५) "राज्यातील रस्ते अपघातग्रस्तांना ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यु होण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असते त्यामुळे पूर्व द्रुतगती महामार्ग, लालबहादूर शास्त्री मार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-नाशिक द्रुतगती महामार्ग येथे शासनाने तातडीने ट्रामा केयर सेंटर सुरू करावेत तसेच लालबहादूर शास्त्री मार्ग, मुलुंड येथे असलेल्या कामगार राज्य विमा योजनाअंतर्गत सुरू असलेल्या हॉस्पिटलमध्ये २४ तास अद्ययावत वैद्यकीय सेवा देण्याची व्यवस्था करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विकास कुंभारे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २१०, २११, २१२, २१३ व २१४**

(२१०) "अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला "संत गजानन महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला" असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापीठाचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२११) "राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली समस्या, घनकचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करता येत नसल्यामुळे दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, याकरिता या घनकचऱ्यामधून निर्माण होणाऱ्या मिथेन गॅसपासून वीज निर्मिती करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१२) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१३) "राज्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही तसेच आर्थिक भूर्दंडही सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१४) "राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारा घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. गणेश नाईक वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २१६ व २१८**

(२१६) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२१८) “राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. राहूल कुल, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २२१, २२२ व २२३**

(२२१) “राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२२२) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२२३) “राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २२५, २२६, २२७, २२८ व २२९**

(२२५) “दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई

आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रयरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२६) "तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२७) "केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरीता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२८) "विदर्भातील वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मिती पैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती करूनही विदर्भातच मोठ्या प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असताना सुद्धा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हाणीच्या नावाने पैसा वसूल करणे, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकावर होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण येऊन विकासही न होणे, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता तथा विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२९) "राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना व्यवस्थापन अभावी बंद पडतात, त्यामुळे सदर योजनांची देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २३०, २३१ व २३४**

(२३०) "राज्यात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विकास करणे, गड किल्ले यांचे संवर्धन करणे, तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यातील सर्व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३१) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांशी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३४) "राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने, एम.आय.डी.सी. व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील रसायन मिश्रित प्रदूषित सांडपाणी नदीपत्रात सोडण्यात येत असल्याने नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकणातील ठाणे जिल्हा व पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झालेले असणे, या नद्यांच्या पाण्यातील जीवसृष्टी नष्ट होत चालली असून, या प्रदूषित पाण्याचा नागरिकांच्या आरोग्यावर व मच्छिमार बांधवांच्या जीविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता, राज्यातील वाढत्या जलप्रदूषणाच्या समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे".

**श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २३७, २३८, २३९, २४० व २४१**

(२३७) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३८) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३९) "राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४०) "दारिद्र रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रीकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयांचे झालेले अवमूल्य यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्ररेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४१) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरीत्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संतोष दानवे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २४४, २४५ व २४६**

(२४४) "राज्यात बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात

घेता पाणी टचांई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४५) "राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४६) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकिय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २४७, २४८, २४९ व २५०**

(२४७) "राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली समस्या, घनकचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करता येत नसल्यामुळे दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, याकरिता या घनकचऱ्यामधून निर्माण होणाऱ्या मिथेन गॅसपासून वीज निर्मिती करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४८) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासनीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४९) “राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरू करणे, सदरची उपचार केंद्रे सुरू झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२५०) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २५५, २५६, २५७, २५८ व २५९**

(२५५) “राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२५६) “मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किमतींत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२५७) “राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले

अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५८) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५९) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासनीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**सतरा** : सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरीत करण्यात येईल.)

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १८ फेब्रुवारी २०२०.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई